# वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय

## महा-राज्य कामगार विमा सोसायटी

तिसरा मजला, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, गणपतराव जाधव मार्ग, वरळी, मुंबई -१८

महाराष्ट्र शासन

## Office of the Administrative Medical Officer,

MH-Employees' State Insurance Society

3rd floor, E.S.I. Scheme hospital, Ganpatrao Jadhav Marg, Worli, Mumbai-४०० ०१८.

ई-मेल: e-mail: mumbai.amo@gmail.com / amo.mumbai-esis@gov.in दुरध्वनीक्र./Telephone No: २४९८६०५९


क्र.वैप्रअ/महा-राकाविसो/ई/निर्लेखन जाहिरात/ 2418 /२०२६, दि. 06 APR 2026

प्रति,
मा.अवर सचिव,
माहिती व तंत्रज्ञान,
मंत्रालय, मुंबई

**विषय:** महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी अंतर्गत वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा-राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय, मुंबई कार्यालयातील जुन्या वापरात नसलेल्या फर्निचरचे निर्लेखन करण्यासंदर्भात जाहिरात संकेतस्थळावर उपलब्ध करणेबाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वैद्यकीय प्रशासन अधिकारी, यांचे कार्यालय, महा- राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय, मुंबई येथील सोबतच्या यादीप्रमाणे या कार्यालयातील जुन्या वापरात नसलेल्या निर्लेखित करावयाच्या फर्निचरची विक्री करणेबाबत दरपत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेले कागदपत्रे दोन्हीचे एक पाकीट तयार करुन सिलबंद पाकिटात दि. १६.०४.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० पर्यंत या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावेत

तसेच विहित वेळेतील प्राप्त निविदा दि. १७.०४.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता, वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय, महा - राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय, मुंबई यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकाना उपस्थित राहण्यास परवानगी आहे. सदर निविदाधारक हजर न राहील्यास त्याच्या गैरहजेरीमध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल. याबाबत निविदाधारकाचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाहीत.

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, सोबतच्या नमुन्यातील सिलबंद दरपत्रके मागविणारी जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर कृपया अपलोड करण्यात यावी, हि विनंती.

(सोबत निविदा नमुना अटी, शर्ती व विक्रि करण्यात येणाऱ्या फर्निचरची यादी जोडली आहे.)

(डॉ. कश्यप द्विवेदी)
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
महा-राकावि सोसायटी, वरळी, मुंबई



Scanned with CamScanner

# निविदा संदर्भातील अटी व शर्ती

१. मोहरबंद पाकिटात निविदा दिनांक ०७.०४.२०२६ ते दिनांक १६.०४.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, तिसरा मजला, रा.का.वि. योजना रुग्णालय इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८ येथे सादर करावी. २. 'जसे आहे तशा स्थितीत' विक्रिकरीता असलेल्या वस्तु वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय मुंबई येथे ठेवण्यात आल्या आहेत. सदर नावानिशी वस्तुंच्या निविदा सादर करणाऱ्या इच्छुकाला निविदेमधील सामान पाहण्यासाठी वैद्यकीय प्रशासन अधिकारी मुंबई या ठिकाणी दिनांक ०७.०४.२०२६ ते १६.०४.२०२६ पर्यंत सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) पाहता येईल. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवशी सामानाची पाहणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

२. ज्यांना रजिस्टर पोष्टाने निविदा पाठवायची आहे. त्यांनी दिनांक १६.०४.२०२६ पर्यंत सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने पाठवावी. अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

३. अनामत रक्कम रु.१०,०००/- एवढया रकमेचा डिमांड ड्राफ्ट **"ACCOUNT OFFICER OFFICE OF THE ADMINISTRA TION MEDICAL OFFICER"** या नावाने अथवा रोखीने कार्यालयातील रोखपाल यांच्याकडे जमा करावी व अनामत रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेले कागदपत्रांचे स्वतंत्र पाकीट असे दोन्ही पाकीटे सिलबंद एका पाकीटात भरुन पाठवाव्यात. (TECHNICAL AND FINANCIAL ची वेगळी पाकीटे एकाच पाकीटात घालावीत.) तसेच सदर वस्तुंचा नावानिशी स्पष्ट उल्लेख असावा. वजनाप्रमाणे/किलो प्रमाणे दर नमूद करावेत.

५. ज्या निविदाधारकांनी अनामत रक्कम भरलेली आहे. परंतु ज्यांची निविदा बाद झाली असल्यास त्यांची अनामत रक्कम परत केली जाईल.

६. विहित वेळेतील प्राप्त निविदा दि. १७.०४.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता, वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय, महा-राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय, मुंबई यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहण्यास परवानगी आहे. सदर निविदाधारक हजर न राहील्यास त्याच्या गैरहजेरीमध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल. याबाबत निविदाधारकाचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाहीत.

७. निविदा पाकीटावर खरेदीधारकाने आपले संपूर्ण नाव व पत्ता मोबाईल नंबर नमूद करावा. तसेच कोणकोणत्या कारणासाठी निविदा सादर करत आहे ते पाकीटावर नमूद करावे.

८. यशस्वी निविदाधारकास, निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवड्यात वस्तूंचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व अनामत रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पुर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. जर जडसंग्रह वस्तूंची योग्य ती किंमत निविदाधारकाकडून न आल्यास निविदा नामंजूर करणे, स्थगिती देणे तसेच कोणतीही पुर्व सुचना न देता निविदा रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार वैद्यकीय प्रशासन अधिकारी, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत. वैद्यकीय प्रशासन अधिकारी, मुंबई हे कोणतेही कारण न देता सर्व निविदा फेटाळू शकतात.

११. सदर वस्तू खरेदी हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.





Scanned with CamScanner

१२. प्रशासकीय किंवा तांत्रीक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

१३. पॅनकार्ड/जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र/महाराष्ट्र दुकाने व आस्थापना(नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम,२०१८ नमुना "ग" प्रमाणपत्र/इनकमटॅक्स रिटर्न मागील वर्षाचा/संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र/आधार कार्ड, गुमास्ता रजीस्ट्रेशन प्रमाणपत्र इत्यादी दस्तावेज असणे बंधनकारक आहे. सदर दस्तावेज बंद पाकीटामध्ये सादर करावे.

१४. ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर करण्यात आल्यापासून ७ दिवसांच्या आत सुट्टीचे दिवस वगळून सामानाच्या वजनानुसार एकूण रक्कम रोखपाल विभागात जमा केल्यानंतरच सामानाची उचल करता येईल.

१५. निरुपयोगी साहित्य ताब्यात घेताना रुग्णालयाच्या इमारतीचे अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदारास नुकसानीबाबत जबाबदार धरुन संबंधितांकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल.

१६. दरपत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी व कंपनीचा स्टॅम्प असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी व स्टॅम्प नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१७. खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे शासकीय कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यामधून कोणत्याही प्रकारचे सुट देण्यात येणार नाही. कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील.

(डॉ. कश्यप द्विवेदी)
अध्यक्ष तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
निर्लेखन समिती
वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय
महा-राकावि सोसायटी, वरळी, मुंबई

Scanned with CamScanner

| वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महा- राज्य कामगार विमा सोसायटी कार्यालय, मुंबई कार्यालयातील निर्लेखन करावयाच्या सामानाची यादी. | |
|---|---|
| अ.क्र. | वस्तूचे नाव |
| १. | लोखंडी कपाटे |
| २. | लोखंडी केनिंग खुर्च्या |
| ३. | लोखंडी रॅक |
| ४. | लाकडी टेबले |
| ५. | लाकडी केनिंग खुर्च्या |
| ६. | लाकडी कपाटे |
| ७. | रद्दी पेपर |

**(डॉ. कश्यप द्विवेदी)**
अध्यक्ष तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
निर्लेखन समिती
वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय
महा-राकावि सोसायटी, वरळी, मुंबई

Scanned with CamScanner